# 2.4.11: Institution adopts effective monitoring mechanisms during internship programme

## Documentary evidence in support of the response

सहयोग सेवाभावी संस्था

# कॉलेज ऑफ एज्युकेशन, विष्णुपूरी, नांदेड.



(शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम)

## आंतरवासिता कार्य

प्रात्यक्षिक कार्य

– नियोजन वही –

शैक्षणिक वर्ष २०२2 - २०23

हजेरी क्र. ( 03 )

छात्र शिक्षकाचे नाव शेख म. करीम म. अनिस

शाळेचे नाव जि.प.प्रा.केंद्रीय शाळा, धनगरवाडी

वर्ग 6,7वी कुल क्रमांक व नाव

अध्यापन विषय : हिंदी, इतिहास

विजय, असर्जन ९४२१७६१११४

शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम

# आंतरवासिता कार्य

## प्रात्यक्षिक कार्य

## नियोजन वही

अध्यापक महाविद्यालयाचे नांव : सहयोग सेवाभावी संस्थेचे, अध्यापक महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड.

छात्रशिक्षकाचे नांव शेख महमद करीम महमद अनिस

पत्ता : देगलूर नाका, नांदेड

प्रथम वर्ष द्वितीय सत्र हजेरी क्रमांक 03

दिनांक 3/7/२०23 ते 7/7/२०23

Seen
10/08/2023

प्राचार्यांची सही

# आंतरवासिता कार्य (Internship)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने एन.सी.टी.ई.च्या मार्गदर्शक तत्वानुसार शै. वर्ष २०१५-१६ पासून शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम दोन वर्षाचा करण्याचे ठरविले व ते चालू शै. वर्षापासून अंमलात आणले आहे.

माध्यमिक शिक्षकांच्या सेवापुर्व प्रशिक्षणात हा कार्यकाल वाढविण्यामागे शिक्षणतज्ञाचा फार मोठा विचार आहे.भावी शिक्षक हा ज्ञानाने समृध्द कलेने पारंगत व अनुभवाने मोठा असेल तरच विद्यार्थी घडवू शकतो. म्हणून प्रशिक्षणार्थीचा अनुभव समृध्द होण्यासाठी व शालेय स्तरावरील चालणा-या कार्याची ओळख, नियोजन व जबाबदारी सांभाळण्याची कर्तव्यदक्षता त्यांच्या अंगी बाणवण्यासाठी हा आंतरवासिता कालावधी १६ आठवड्याचा दिलेला आहे. त्यातील ४ आठवडे प्रथम वर्षाकरिता व १२ आठवडे द्वितीय वर्षाकरिता अशी विद्यापीठीय स्तरावर विभागणी केली आहे.

प्रथम वर्षाच्या ४ आठवड्यात करावयाचे कार्य म्हणजे प्रथम आदर्श व नाविन्यपूर्णशाळांची पाहणी करणे. तेथील कार्य व शिस्त समजावून घेणे नंतर नियोजित शाळेवर तज्ञांच्या पाठाचे निरिक्षण करणे व आपल्या अध्यापनात असलेल्या उणिवा दूर करुन अधिकाधिक कौशल्यपूर्ण प्रभावी व परिणामकारक अध्यापन करणे.

या सेवाकाळात मानवी संबंधाची जाणीव विद्यार्थ्यांना होईल.समव्यवसायिक शिक्षक, मुख्याध्यापक प्रशासनातील व्यक्ती यांचे संबंध जोपासणे व समायोजन साधण्याची प्रक्रिया समजून घेता येईल.

## *आंतरवासिता कार्याचे फायदे :*

१) आदर्श व नाविन्यपूर्ण शाळा बनवण्यास प्रेरणा मिळेल.
२) तज्ञ शिक्षकांच्या पाठांचे निरिक्षण केल्यामुळे आपल्या पाठात सुधारणा घडवून आणता येईल.
३) तज्ञांच्या निरिक्षणाखाली पाठ घेतल्यामुळे योग्य ते मार्गदर्शन मिळेल.
४) शाळेचे नियम, अटी, शिस्त, जबाबदारी, नियोजन या विषयी सर्वंकष माहिती होईल.
५) शालेयस्तरावर अध्ययन - अध्यापनाशिवाय चालणाऱ्या कार्याची ओळख होईल.
६) अध्यापनाशिवाय शिक्षकांवर असणाऱ्या जबाबदारीची जाणीव होईल.
७) खेळाचे, सांस्कृतीक कार्यक्रमाचे, तसेच आयत्यावेळी येणाऱ्या कार्याचे नियोजन करता येईल.
८) नेतृत्त्वगुण वाढीस लागतील.
९) अभ्यासपूरक उपक्रमाचे नियोजन करता येईल.
१०) शिक्षक-विद्यार्थी शिक्षक-शिक्षक अंतरक्रिया अभ्यासता येईल.

# आंतरवासिता कार्य

## कार्यक्रमाची रुपरेषा

( एकूण ७५ गुण )

माध्यमिक स्तरावरील व उच्च माध्यमिक स्तरावरील विविध विषय शिकविण्यासाठी कौशल्य संपादन करणे हे प्रात्यक्षिक कार्याचे प्रधान उद्दिष्ट आहे. छात्राध्यापकांच्या विविध शालेय बाबींचा मुलांच्या समस्यांचा आहे. या चार आठवड्यात पुढील प्रमाणे कामकाज करावे.

( १५ गुण )

**१) पहिला आठवडा -**

एका शाळेला भेट

( २० गुण )

**२) दुसरा आठवडा -**

१) दोन्ही अध्यापन पध्दतीच्या तज्ञ शिक्षकांचे प्रत्येकी दोन पाठांचे निरिक्षण

२) वर्गात चालणाऱ्या संपुर्ण ACTIVITIES चे निरिक्षण करणे.

( २० गुण )

**३) तिसरा आठवडा -**

१) दोन्ही अध्यापन पध्दतीचे एक या प्रमाणे दररोज दोन पाठ घेणे.

२) शाळेतील इतर उपक्रमात सहभागी होणे.

( २० गुण )

**४) चौथा आठवडा -**

दररोज दोन तास खालील क्षेत्रातील माहिती घ्यावी.

१) भौतिक सुविधा

२) शालेय दप्तर

३) ग्रंथालय

४) प्रयोगशाळा

उर्वरीत कालावधी शालेय उपक्रमात सहभागी व्हावे.

# १) पहिला आठवडा

(चांगल्या किंवा आदर्श शाळा / संशोधन शाळेला भेट )

१) संस्थेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगरवाडी ता. जि. नांदेड

२) पत्ता : जि. प. प्रा केंद्रिय शाळा, धनगरवाडी. ता. जि. नांदेड.

३) शाळेच्या मुख्याध्यापकाचे नाव : श्री. सोनटक्के भगवान नारायणराव

४) शिक्षकांची संख्या : मुख्याध्यापकास मिळून एकुण शिक्षकांची संख्या ४ आहे.

५) शाळेचा प्रकार / अनुदानित / विनाअनुदानित / मुलांची / मुलींची :

शाळेचा प्रकार जि. प. शाळा असून शासनाद्वारे शाळा चालवली जाते. शाळेतील विद्यार्थी संख्या देखील खूप प्रमाणात आहे.

६) शाळेची इमारत : शाळेची इमारत ही प्रशस्त असून, सर्व सोई-सुविधा, वर्गखोल्या आहेत.

अ) बैठक व्यवस्था : शाळेची इमारत ही मोठ्या जागेत असुन शाळेच्या कर्मचाऱ्यांसाठी बैठकाची स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे.

# २) दुसरा आठवडा

**अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण ४ पाठ (अध्यापन पध्दतीचे प्रत्येकी २ पाठ)**

पाठ घेणाऱ्या शिक्षकाचे नांव : सोळंके सुनिता मॅडम विषय : हिंदी

शाळा : जि. प. प्रा. कें शाळा, धनगरवाडी वर्ग - 6 वा

दिनांक : 4/7/2023 तासिका - 2

पाठ निरीक्षण करणाऱ्या विद्यार्थ्याचे नांव : शेख करीम निरीक्षकाचे नाव :

घटक : 'उपहार' अध्यापन पध्दती :

१) प्रस्तावना : उदाहरण देकर और प्रश्न पूछे।

२) प्रश्न : प्रश्न पुछकर सबको जवाब का मौका दिया।

३) फलक कार्य : अक्षरों का आकार योग्य था। मुश्किल शब्दों का अर्थ फलक पर लिखा।

४) शैक्षणिक साहित्य :

५) शिक्षकाचे व्यक्तिमत्व : प्रभावशाली था। विद्यार्थीयो को पाठ का आशय समझ में आया।

६) उद्दिष्टांची पूर्तता : अच्छे से हुई है।

७) विद्यार्थ्यांचे सहकार्य ~~अच्छा मिला है।~~

८) पाठासंबंधी सर्वसाधारण मत पाठ अच्छा हुआ छात्रो को पाठ समझमे आया।

९) पाठासंबंधी उपयुक्त सूचना

# ३) तिसरा आठवडा
## (तासिका नियोजन)

तिसऱ्या आठवड्यात छात्राध्यापकाने रोज दोन तासिका घ्यावयाच्या आहेत या सहा दिवसात एकूण बारा तासिका घ्यावयाच्या आहेत. त्या तासिका खालील प्रमाणे घेण्यात याव्यात.

| | | |
|---|---|---|
| ३ तासिका | : | पहिली अध्यापन पध्दती |
| ३ तासिका | : | दुसरी अध्यापन पध्दती |
| २ तासिका | : | कला कार्यानुभव |
| २ तासिका | : | योगा आणि शारिरीक शिक्षण |
| २ तासिका | : | मूल्यमापन (परीक्षा) |

# पाठाचे संक्षिप्त टाचण

पाठ क्रमांक : 4

इयत्ता : 6वी तुकडी : — दिनांक : 5/7/23 तासिका क्रमांक : 1

विषय : हिंदी पाठ्यांश : उपहार

पाठाचे उद्दिष्टे : १) उपहार की जानकारी देना अच्छे गुनों से परिचित करना

३) पुस्तको मित्र ४) पाठ का आशय समझाना

शैक्षणिक साधने :

| आशय (पाठ्यवस्तु) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापक कृती(अध्ययन अनुभव) | अध्ययन अनुभव / विद्यार्थी कृती |
|---|---|---|
| उद्दि: पाठ से सिख लेना। स्प: उपहारो की जानकारी देकर पाठ का आशय की समझ देना। शैक्षणिक साहित्य : पद्धती , मूल्यमापन : | आप कीसी रिश्तेदार की शादी मे जाते हो तो क्या आप खाली हात जाते हो, नही ना, कुछ ना कुछ देने के लिए लेकर जाते हो ना? क्या लेकर जाते हो? उसी गिफ्ट को हिंदी मे 'उपहार' कहते है। उपहार खुश करने के लिए, मान सन्मान, या अपनी खुशी जाहिर करने के लिए दिया जाता है। | श्रवण करते है। गिफ्ट |

फलक लेखन : शिर्षकलेखन, कठिन शब्दों का अर्थ।

प्राध्यापकाचा शेरा व सही :

# ४) चौथा आठवडा

(विविध सुविधा व अहवाल)

१) ग्रंथालय : स्वतंत्र ग्रंथालय वर्गाची सुविधा नव्हती.

२) वाचनालय : वाचनालयाची सुविधा नव्हती.

३) मासिके : शाळेत मासिका येते.

४) नियतकालिके : —

५) वृत्तपत्रे : दररोज शाळेमध्ये २ ते तीन वृत्तपत्र येतात. लोकमत हे वृत्तपत्र येते.

६) विशेष उपक्रम : —

ब) पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाः शाळेत विद्यार्थी व शिक्षक वर्गासाठी पिण्याच्या पाण्यासाठी 1000 लिटर च्या पाण्याची व्यवस्था केलेली आहे. पिण्याचा पाणि हा बोअरवेल चा असुन पिण्याच्या पाण्यासाठी तो पाणि वापरला जातो.

क) प्रसाधन गृहाची व्यवस्था : शाळेच्या वर्गखोल्याच्या दूर प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आलि असून मुला व मुलिंसाठि वेगवेगळे प्रधान ग्रह आहेत.

ड) सुरक्षिततेच्या संदर्भात सोयी सुविधा : सुरक्षेच्या दृष्टीकोनाने शाळेच्या खोल्या ह्या स्वतंत्र असुन मोठ्या ग्राउंड खोल्या समोर आहे. तसेच पाण्याची ही व्यवस्था केलेली आहे.

इ) पालक मेळाव्या संदर्भात माहिती : जि. प. प्रा. केंद्रिय शाळा धनगरवाडी येथे वर्षात पालक मेळाव्या होत असतात.

अहवाल लेखन :

सहयोग सेवाभावी संस्था, अध्यापक महाविद्यालय विष्णुपुरी, नांदेड याच्या विद्यमानाने. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रिय शाळा धनगरवाडी. नांदेड. येथे दि. 03/7/2023 ते 15/7/2023 दरम्यान आंतरवासिता पाठ घेण्यात आले होते.

जि. प. प्रा. केंद्रिय शाळा धनगरवाडी, ही शाळा विद्यापिठाच्या समोर 2 ते 3 km अंतरावर आहे. दि. 3/7/2023 रोजी शाळेवर आमचा प्रथम दिवस होता. 10:00 वाजता शाळेवर परिपाठ होतो. आम्ही सुध्दा 10:00 ला शाळेवर पोहचलो. पोहचल्यावर आम्हाला तिथे मुले व आमचे शिक्षक व इतर अध्यापक मिळाले. थोड्या वेळातच परिपाठ सुरु झाला. परिपाठ हा वर्गाच्या मुलांनीच घेतला. सर्वांना ऐकू येईल यासाठी Bluetooth Sound bar (स्पिकर) ची सुविधा करण्यात आली होती.

10:00 ते 10:30 पर्यंत परिपाठ झाला व त्यानंतर सर्व विद्यार्थी वर्गात गेले. मी इयत्ता 6 वी वर्गशिक्षक झालो होतो. त्यामुळे मी इयत्ता 6 वी मध्ये पहिली तासिका घेण्यासाठी गेलो. वर्गामध्ये सर्वप्रथम गेल्यावर मी माझा व त्या मुलांचा परिचय करून घेतला. (वर्गात एकुण 11 विद्यार्थी होते).

अहवाल लेखन : सर्व परिचय झाल्यानंतर मी माझ्या विषयाच्या हिंदीच्या तास घेण्यास सुरुवात केली।

बघता बघता 30 मिनिटे कधी निघून गेले हे कळाले नाही.

आमच्याकडून शाळेत विविध उपक्रम व स्पर्धा घेण्यात आले होते. 'झाडे लावा, झाडे जगवा', रांगोळी स्पर्धा, विविध खेळ, व परिक्षा अशा विविध स्पर्धा व उपक्रम घेण्यात आल्या होत्या.

दि. 8/7/2023 रोजी शाळेच्या परिसरामध्ये झाडे लावण्यात आली.

शाळेची वेळ ही 10 ते 4 आहे. आणि भोजनाची वेळ ही 12:45 ते 2 होती.

शाळेत पोषक आहार योजने अंतर्गत शाळेमध्ये आहार दिले जाते, कधी, खिचडी तर कधी वरण भात, मटकी, चना अशा विविध आहार दिले जातात.

विशेष म्हणजे तेथील स्वयपाक तयार करणाऱ्या मावशी आमच्या साठी सुध्दा ते भोजन जास्तीचा तयार करत होता. अगदी गरमागरम व स्वच्छतेचा ध्यान ठेवून तयार केलेले भोजन व मावशीचे बोलणे 'जेवढे लागते तेवढेच घ्या, जास्तीचे घेऊन फेकू नका' हे मात्र लक्षात राहील।

अहवाल लेखन :

नृत्य 'Dance' चा कार्यक्रम पण ठेवण्यात आला.

विविध स्पर्धा व कार्यक्रम घेऊन त्यामध्ये प्रथम व द्वितीय बक्षीस देण्यात आले. या 12 दिवसांमध्ये शिक्षक म्हणून काम करणे व शिक्षकांच्या जबाबदाऱ्या पार पाडणे, वर्ग सांभाळणे अशा बाबी आम्हाला शिकण्यास भेटल्या.

दि. 3/7/2023 ते 15/7/2023 दरम्यान शिक्षक म्हणून कार्य करणे अनुभव घेणे, शिक्षाविद्या पद्धती काही त्रुटी लक्षात व ते सुधारणे अशा अनेक गोष्टी शिकण्यास मिळाल्या.

आमच्या आयुष्यातील शिक्षकी पेशात जाण्यासाठी हा टप्पा खरोखरच खुप महत्वपूर्ण होता.

Seen